श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत
अधिकारी, पं.स. संगमनेर यांची ऐच्छिक सेवा
निवृत्ती रद्द करण्याबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-१/५७५/२०२६
दिनांक:-स्वाक्षरीखाली नमूदप्रमाणे

संदर्भ:-१. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्राप-१/५५७/२०२६ दि. ०१/१०/२०२६.
२. श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी यांचा अर्ज दि. ०५/१०/२०२६.
३. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (५).

या कार्यालयाकडील संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांची दि. ३१/१०/२०२६ रोजी मध्यानोत्तर ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजूर करण्यात आली होती. तथापि, श्री. क्षीरसागर बाळू बगाजी यांनी संदर्भ क्र. २ मधील अर्जाद्वारे सदर मंजूर केलेली ऐच्छिक सेवानिवृत्ती मागे घेण्याबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(५) मधील तरतुदीनुसार, या कार्यालयाकडील संदर्भ क्र.१ अन्वये श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांची मंजूर करण्यात आलेली ऐच्छिक सेवानिवृत्ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत असून श्री. क्षीरसागर बाळू बगाजी यांची सेवा पूर्ववत व नियमित चालू राहील. सदर आदेशाची नोंद श्री. क्षीरसागर यांच्या मूळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 20261015060191 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 15-10-2026 14:29:34
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति - श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर
द्वारा- गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर

प्रत - गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांना पुढील उचित कार्यवाहीसाठी रवाना.